प्रेस रिलीज

**नाविन्य आणि तंत्रज्ञान हस्तांतरण विभाग, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चर (इनोव्हेशन अँड टेक्नोलॉजी ट्रान्स्फर सेल, एमसीसीआयए)**

**–राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र सरकार ह्यांच्या सहकार्याने**

**तंत्रज्ञान हस्तांतरण**
**नाविन्यपूर्ण औद्योगिक उत्पादने संशोधन व विकास**
**बौद्धिक मालमत्ता हक्क सुरक्षा सहाय्य केंद्र**

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी नुकतीच , सरकारचा नव उद्योग – उद्योजकता उपक्रम जाहीर केला आणि देशातील नव उद्योग, प्रथम पिढी उद्योजक आणि उद्योजकता वाढीस लावण्याच्या मोहिमेची घोषणा केली.यामध्ये प्रामुख्याने हा नाविन्यपूर्ण उत्पादन, उपक्रम(इनोव्हेशन), उद्योजकता (आन्त्रप्रेन्युअरशीप) आणि नव –प्रथम पिढी उद्योग ,प्रारंभिक व्यवसाय (स्टार्ट अप्स) प्रस्थापनेवर विशेष जोर देण्यात आला आहे. हा संपूर्ण उपक्रम निश्चितच तंत्रज्ञान, नव नाविन्यपूर्ण संशोधन ,इनोव्हेशन आणि नवीन उत्पादन विकासाभिमुख आहे.तंत्रज्ञानहस्तांतरण ही एक प्रक्रिया आहे , ज्याद्वारे तंत्रज्ञान कौशल्ये, ज्ञान, आणि उत्पादन पद्धती यांचे संशोधन ते उत्पादन प्रक्रीयाकरण व हस्तांतरण केले जाते. संशोधन संस्थात, केंद्रात व प्रयोग शाळेत विकसित झालेल्या व औद्योगिक, तसेच व्यापारी शक्यता असलेल्या अनेक उत्पादनांना तसेच तंत्रज्ञानाला ह्या प्रकियेमुळे व्यावसायिकता प्राप्त होते. ह्याचा फायदा नवीन उद्योजक तसेच प्रस्थापित उद्योजकांना नक्कीच होतो.
इन्स्टीट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजीमुंबई (आयसीटी - पूर्वीची युडीसीटी), राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणे (एनसीएल) ,विद्यापीठे ,विद्यालये आणि अश्या कित्येक नामांकित संस्था आज अश्या संशोधनात कार्यरत आहेत व अनेक संशोधने जतन करून आहेत. परंतु, त्यांच्या ह्या संशोधनाला योग्य व्यावसायिक संधी मिळत नाही किंवा पाहिजे तसा सुयोग्य व्यावहारिक उपयोग केला जात नाही. ह्या सुयोग्य तंत्रज्ञानाचा व उत्पादनांचा उपयोग सूक्ष्म ,लघु व मध्यम उद्योग , उद्योजकांना तसेच सामान्य नागरीका नक्कीच होऊ शकतो. अनेक उद्योजक जे या तंत्रज्ञानाचानाविन्यपूर्ण उत्पादनासाठी व्यावहारिक उपयोग करू शकतील, जेणेकरून उद्योजकतेला आणखी चालना मिळेल, यासाठीपुढाकाराने प्रयत्नहोण्याची गरज आहे.

हेच उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन आणि माननीय पंतप्रधानांच्या उपक्रमाला सक्क्रीय पाठींबा देण्याच्या हेतूने मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चर (एमसीसीआयए) **राजीवगांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाच्या सक्रीय पाठींब्याने** पुण्यामध्ये एका नवीन ,नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान हस्तांतरण विभागाची (इनोव्हेशनअँडटेक्नोलॉजीट्रान्स्फरसेल) स्थापना करत आहे . व्यापारी व्यावहारिक दृष्ट्या उपयुक्त ठरतील असे तंत्रज्ञान आणि प्रक्रिया शोधण्यासाठीआणि त्या आणि अंतिम उत्पादकाला, उद्योजकाला उपलब्ध करून

देण्यासाठीहा विभाग काम करणार आहे.याखेरीज मराठा चेम्बर **नाविन्यपूर्ण औद्योगिक उत्पादने संशोधन व विकास**

**बौद्धिक मालमत्ता हक्क सुरक्षा सहाय्य केंद्र**

सुद्धा स्थापन करत आहोत व त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर उद्योजकांना व उद्योगाला होईल.

हा विभाग तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे आणि उपलब्ध करून देण्याचे काम करणार आहे.यामुळे सूक्ष्म ,लघु, मध्यम उद्योग, स्टार्ट अप्स यांना प्रकल्प हाती घेऊन अधिक उत्पन्न मिळविण्याचा लाभ देखील होणार आहे.

**या विभागाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:**

- तंत्रज्ञानाचे कार्यक्षम हस्तांतरण
- उद्योजकतेला प्रोत्साहन आणिउद्योजकता विकास
- संशोधन आणि विकास, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान ,उत्पादने उत्पादन प्रोत्साहन देणे
- तंत्रज्ञान हस्तांतरणाद्वारे सूक्ष्म ,लघु आणि मध्यम उद्योगांच्या(एसएमई) प्रगतीला चालना देणे

**हा विभाग पुढील उपक्रम देखील हाती घेणार आहे:**

- शासकीय प्रयोगशाळा/संस्था/विद्यापीठे यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा शोध घेणे
- तज्ञ मंडळातर्फे तंत्रज्ञानाची व्यवहार्यता आणि व्यापारीकरण टिकाऊपणा यांची पडताळणी करणे
- व्यावसायिक व्यापारी वापरासाठी ते उपलब्द्ध करून देणे
- विभागाने तयार केलेल्या डीपीआरच्या आधारे प्रकल्प हाती घेण्यास उत्सुक असे उद्योजकआणि अंतिम उपभोक्ता शोधणे
- डीपीआर आणि अन्य कागदपत्रे तयारकरणे
- प्रकल्पाला पाठींबा देण्यासाठी वित्तपुरवठा संस्था शोधणे
- विविध क्षेत्रातील केंद्र आणि राज्य सरकारच्याविविध संयुक्तिक योजनांच्या माहितीचे एकत्रीकरण करणे व तिचा प्रसार करणे
- संशोधन आणि तंत्रज्ञान विकास कार्यात गुंतलेल्या संशोधन आस्थापनांमध्येपरस्पर संपर्क स्थापित करणे

सुरवातीलाहा विभाग अन्न तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, पाणी, उर्जा, कृषी, बायो टेकनोलोजी या क्षेत्रातील प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करणार आहे. केंद्राने पुढील कारवाई साठी तीन प्रकल्प आपल्या उद्घाटनासाठी शोधले आहेत. ज्यांचे काम त्वरित सुरु केले जाणार आहे.पुढीलतीन प्रकल्पांचे काम सविस्तर चर्चा झाल्यानंतर हाती घेतले जाणार आहे;

१. मासे वळविण्यासाठी सौर उर्जा यंत्रणा
२. भाज्या सुकविण्यासाठी प्रकल्प
३. हळद उत्पादन प्रकल्प

ह्या प्रकल्पाला दिशा ,सल्ला , देण्यासाठी शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली तांत्रिक सल्लागार समिती तयार करण्यात आली आहे.

या समितीचे मान्यवर सभासद पुढीलप्रमाणे:

1. **Dr. Anil Kakodkar**, Chairman, Rajiv Gandhi Science and Technology Commission
2. **Mr. Satish Magar**, President MCCIA, (co chair), Chairman & Managing Director, Magarpatta Township Development.& Constrn. Co. Ltd.
3. **Mr. Prataprao Pawar**, Chairman, Sakal Papers Ltd.
4. **Dr. D.K. Jain,** Additional Chief Secretary (Agriculture & Marketing), Government of Maharashtra
5. **Mr. Arun Firodia**, Chairman, Kinetic Engineering Ltd
6. **Mr. Mukesh Malhotra**, Managing Director, Weikfield Products Corporation LLP
7. **Mr. Pradeep Bhargava**, Director, Cummins India Ltd.
8. **Mr. Ajay Mehta**, Managing Director, Deepak Nitrite Ltd.
9. **Mr. M.A. Tejani**, Managing Director, Gits Food Products Pvt. Ltd.
10. **Mr. Pramod Chaudhari**, Executive Chairman, Praj Industries Limited
11. **Dr. Arun Sapre (RGSTC),** Member Secretary, Rajiv Gandhi Science and Technology Commission, Govt. of Maharashtra
12. **Dr. Pramod Kale**, Member ( RGSTC), Department of Electronic Science and Integrated Circuit and Information Technology (ICIT)Pvt. Ltd. , University of Pune
13. **Dr. Smita Lele**, Registrar and Professor of Biochemical Engineering, Food Engineering & Tech. Dept, Institute of Chemical Technology
14. **Dr. U.S. Saha**, General Manager, NABARD
15. **Mr. Ravi Tyagi**, General Manager, SIDBI
16. **Mr. Shekher Kulkarni**, Manik Engineers
17. **Dr. Narayan Hegde**, Convener – Project Design Team, Trustee and Principal Adviser, BAIF Development Research foundation
18. **Dr. Ram Takwale**, Member, RGSTC
19. **Dr. V.V. Karnik,** Sygnet Consultants
20. **Mr. Girish Sohani**, President, BAIF

**Convener: Dr. Anant Sardeshmukh**, Director General, MCCIA

**Project Head and Coordinator:** Mrs. Manjari Desai, Director MCCIA

**For media queries please contact Ms. Manjari Desai, Director, MCCIA, 8308809417**